!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

**शिवसेना उपनेते**

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## रुस्तम ए हिंद आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा लवकरच संभाजीनगरात होणार : खासदार चंद्रकांत खैरे यांची ग्वाही

### गणेश महासंघ उत्सव समिती आयोजित कुस्ती स्पर्धेचे खासदार चंद्रकांत खैरे यांच्याहस्ते उद्घाटन

**संभाजीनगर ( ता.२० ) :** महाराष्ट्र केसरी, हिंद केसरी यासारख्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा संभाजीनगरात यशस्वी झाल्या, कुस्तीप्रेमी नागरिकांसाठी लवकरच संभाजीनगरात रुस्तम ए हिंद आंतराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा घेणार असल्याची ग्वाही शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे जन्मदिनाचे औचित्य साधुन जानेवारीत ही स्पर्धा होईल, गणेश महासंघ उत्सव समिती २०१५ आयोजित भव्य कुस्ती स्पर्धेचे उद्घाटक म्हणुन खासदार चंद्रकांत खैरे उपस्थित होते.

यावेळी कुस्ती हा मर्दानी खेळ असुन, कुस्तीचे मल्ल, कुस्ती शौकीन प्रेषक आजही कमी झाले नाही, कुस्तीच महत्व लक्षात घेऊन येणाऱ्या भावी पिढीस कुस्ती विषयी प्रेम कायम ठेवण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या स्पर्धेसाठी ओलंम्पिक स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू, हिंद केसरी, महाराष्ट्र केसरी यासारखे दिग्गज मल्लांचा सहभाग असणार आहे. संभाजीनगर वासीयांच्या सहकार्याने ही स्पर्धा ही यशस्वी करु, असे आश्वासन खासदार चंद्रकांत खैरे यांनी यावेळी दिले.

स्पर्धेच्या या उद्घाटन प्रसंगी संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज पवार, अध्यक्ष संजय बारवाल, उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, जिल्हायुवाधिकारी नगरसेवक ऋषिकेश खैरे, राजु काका नरवडे, कार्याध्यक्ष सचिन खैरे, संदिप शेळके, अनिल मानकापे, ऋषिकेश जैस्वाल, उपशहरप्रमुख हिरा सलामपुरे, गणु पांडे, संतोष बारवाल, शिवाजी लिंगायत, नारायण सुरे, पंच हंसराज डोंगरे, गोंविद भुसारी, शरद कचरे, प्रविण कडपे, किशोर तुळशीबागवाले, मंगेश डोंगरे, नितीन काबलिये, मुक्तार पटेल, भगवान चित्रक, सत्तार पटेल, सज्जन पहिलवान, हरिसिंग राजपुत, संतोष भुजंग, गणेश पवार यांच्यासह लहान-थोर मल्ल, महिला मलांची संख्या लक्षणीय होती.

**प्रसिध्दी प्रमुख**
**गणेश वाघ.**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com
8421415255/9420404329

ganeshwagh4400@gmail.com
8484066606/9604384400